# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक : 11.09.2026** **वार : शुक्रवार**

---

**लसीकरण**

राज्य शासनाच्या गर्भाशयमुख कर्करोगमुक्त महाराष्ट्र या अभियानाअंतर्गत पुणे जिल्ह्यातल्या १५ ते २० वयोगटातल्या मुलींना मोफत एचपीव्ही लस दिली जाणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाला जीविका फाउंडेशनचं सहकार्य मिळालं आहे.
शंभर टक्के लसीकरणाच्या उद्दीष्टानुसार लसीकरणाची सुरुवात जिल्ह्यातल्या आकांक्षित तालुक्यांपासून करण्यात येणार असून, त्यानंतर टप्प्याटप्प्यानं संपूर्ण जिल्ह्यात लसीकरणाचा विस्तार केला जाईल.
प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, कॉर्पोरेट क्षेत्रानं सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या माध्यमातून या अभियानात सहभागी व्हावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

**गणेशोत्सव तयारी आढावा**

पुण्यातला गणेशोत्सव पाहण्यासाठी देशभरातून मोठ्या संख्येनं नागरिक पुण्यात येतात. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता, वीजपुरवठा आणि गर्दी व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षमपणे कार्यरत ठेवावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज दिले. गणेशोत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीत त्या बोलत होत्या.
गणेश विसर्जनाच्या दिवशी विविध विसर्जनस्थळी मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन विसर्जन कुंड तसंच अन्य निर्धारित ठिकाणी आवश्यक प्रकाशव्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेची योग्य व्यवस्था करावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.
या बैठकीला पुणे आणि पिंपरी चिंचवडचे वरीष्ठ प्रशासकीय आणि पोलिस अधिकारी उपस्थित होते.

**एसआयआर**

केंद्रिय निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार येत्या ३० तारखेपर्यंत नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतील नोंदींची दुरुस्ती तसंच नाव वगळण्यासाठी नागरिकांना अर्ज करता येणार आहे. या अनुषंगानं पुणे जिल्ह्यातल्या सर्व मतदान केंद्रांवर १९, २० आणि २६, २७ सप्टेंबर रोजी विशेष शिबिरांचं आयोजन करण्यात आलं आहे. नवमतदार तसंच प्रारूप मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट न झालेल्या पात्र नागरिकांनी या विशेष शिबिरांचा लाभ घ्यावा, असं आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी केलं आहे.

**मेट्रो गणेशोत्सव**

गणेशोत्सवाच्या काळात होणारी शहरातली वाढती गर्दी लक्षात घेऊन प्रवाशांच्या सोयीसाठी दर पाच मिनिटांनी मेट्रो उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मेट्रो प्रशासनानं दिली आहे.

१७ ते २४ सप्टेंबरदरम्यान सकाळी ६ ते रात्री २ वाजेपर्यंत मेट्रो धावणार आहे. तर अनंत चतुर्दशीला म्हणजेच, २५ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता सुरू झालेली मेट्रो सेवा २६ सप्टेंबरच्या रात्री ११ वाजेपर्यंत सलग ४१ तास सुरू राहणार आहे.
दरम्यान, गणेशोत्सवातील वाढती गर्दी लक्षात घेता प्रवाशांनी महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकावर उतरणं टाळावं, असं आवाहन मेट्रो प्रशासनानं केलं आहे. मंडई परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्यानं प्रवाशांनी गर्दी टाळण्यासाठी इतर मेट्रो स्थानकांचा वापर करावा, असं प्रशासनानं म्हटलं आहे.

**पॉवरट्रॅफिक ब्लॉक**

मध्य रेल्वेच्या पुणे विभागानं देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी येत्या रविवारी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक जाहीर केला आहे. या ब्लॉकमुळे जयपूर, नागपूर, अमरावती, जम्मू तावी तसंच सीएसएमटी मुंबईहून येणाऱ्या आणि जाणाऱ्या काही लांब पल्ल्याच्या द्रुतगती गाड्या पुण्यातल्या नियमित स्थानकाऐवजी खडकी किंवा हडपसर इथून सोडण्यात किंवा थांबवण्यात येणार आहेत अशी माहिती रेल्वेच्या पुणे विभागानं दिली.

**सिंहगडावर भगवा ध्वज**

छत्रपती शिवाजी महाराजांचं शौर्य, पराक्रम आणि स्वराज्याच्या प्रेरणादायी इतिहासाची साक्ष देणाऱ्या किल्ले सिंहगडावर आता १०० फुटी भव्य भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे. पुणे प्रथम आणि महापौर मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात येणार असून, आज महापौरांच्या उपस्थितीत ध्वज उभारण्यासाठीची जागा निश्चित करण्यात आली.

**कारवाई**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासनानं पुण्यात भेसळयुक्त खवा आणि पनीरविरोधात धडक कारवाई सुरू केली आहे. या कारवाईत बार्शीहून आलेला सुमारे चार हजार सहाशे किलो खवा तसंच, कर्नाटकातून आलेलं बारा हजार पाचशे किलो पनीर ताब्यात घेण्यात आलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर उकाडा जाणवत होता. उद्याही वतावरण असंच असेल आणि दुपारनंतर जोराच्या वाऱ्यांसह पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**